# मिरा भाईंदर महानगरपालिका
# स्थायी समिती सभा दि. ११/०४/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ११/०४/२००८ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ०७/०४/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ७) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १२) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १३) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १४) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १५) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, / सदस्या, मनपा अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो. त्यांनी मला ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास मला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो आणि आजच्या सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

**नगरसचिव :-**

मा. पिठासिन अधिकारी यांच्या परवानगीने, या सुचनेव्दारे आपणांस कळविण्यांत येते की मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ११/०४/०८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला, लाल बहादूर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. ०७/०४/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ०१, महानगरपालिका हद्दीतील नव्याने तयार होणारे मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स),गाड्यांचे शोरुम, वर्कशॉप, नविन कारखाने यांना पाण्याचे नळ कनेक्शन देणेचे धोरण व दर ठरविणेबाबत.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त्) :-**

मा. सभापती महोदयांच्या वतीने मी प्रथम एक निवेदन सभागृहासमोर करु इच्छितो आपल्या परिवहन सेवेमधील एका बस वाहकाला काल रात्री नऊ ते दहाच्या दरम्यान एका व्यक्तिने अचानक

पणे बसमध्ये शिरुन चाकूने त्याच्यावर वार केलेले आहेत. त्याचे इंन्टेशन त्याला भोसकण्याचेच होते. परंतु सुदैवाने ते दंडावर निभावले आहे. त्याला जवळ जवळ सहा टाके पडले आहेत. अर्ध्या इंचापेक्षा खोल जखम त्याच्या दंडावर झाली आहे. श्री. पाटील म्हणून ते ठेक्यावरचे वाहक आहेत. आणि त्यांना रात्री तुंगा हॉस्पिटलमध्ेय ॲडमिट केलेले आहे. पोलिस केसपण केलेली आहे. या घटनेमुळे सर्व परिवहन सेवेचे कर्मचारी रात्री सेवा बंद करुन चौकीवर जमलेले होते. रात्री सेवा बंद करुन जवळ जवळ पहाटेपर्यंत आपले मा. स्थायी समितीचे सन्मा. सदस्य श्री. पालांडे साहेब पण रात्री तिथे आलेले होते. सर्वांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला आणि त्यांचे जे काही प्रश्न आहेत त्यांची सुरक्षितता आहे किंवा त्यांना जे  हल्ले होतात.त्याचे मिडीयामध्ये असेल किंवा आणखीन वेगळ्या पद्धतीने बदनामी होउन मग जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर पुढची जी काही कार्यवाही होणे अपेक्षित आहे. हे होणे गरजेचे आहे. त्याकरिता त्यांनी सेवा बंद केली होती. पहाटे पाच वाजता आपल्या सर्वांच्या विनंतीला मान देउन त्यांनी सेवा सुरु केलेली आहे. मा. आयुक्त साहेबांच्या उपस्थितीमध्ये आपण यावर एक निश्चितपणे तोडगा काढू. सद्य स्थितीत त्याची प्रकृती ठिक आहे. आणि पोलिस केस केलेली आहे. त्या केसच्या संदर्भात आपण प्रशासनामार्फत पाठपुरावा करु. परंतु तो गुन्हा अनोळखी व्यक्तिच्या नावाने दाखल झालेला आहे. त्याामुळे त्याच्यामध्ये आपल्याला किती यश येईल. रात्री दहाची वेळ असल्यामुळे जुळणे थोडे अवघडच आहे. परंतु अशा घटना पुन्हा होणार नाहीत याकरिता प्रशासनामार्फत प्रयत्न होणे गरजेचे आहे. एवढे निवेदन मी सभागृहासमोर करतो.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते. साहेब आत्ता तुम्ही सांगितले की त्या कंडक्टरला मारहाण केली आणि चाकूने मारले. साहेब त्याची कुठेतरी बाहेर दुश्मनी असेल तर त्याचे ते काहीतरी झाले असेल पण मारणाऱ्या माणसाने त्याला बसमध्ये नव्हते मारायला पाहिजे. कारण त्याची दुश्मनी त्याने त्याच्या गावामध्ये काढायला पाहिजे होती. त्यांच्या बाहेर दुश्मनी असतील आणि आपण त्या सभागृहामध्ये घ्यायच्या.

**एस. ए. खान :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. मागे आपले वाहक आणि ड्रायव्हर यांनी एस.एस.सी. मध्ये बसणारे जे विद्यार्थी होते. त्यांना मारहाण केली होती. आणि मी मा. महासभेमध्ये सांगितले होते की जे वाहनचालक आणि वाहक आहेत. त्यांच्या सुप्रिडेंट तर्फे त्यांचे क्रीमिनल रेकॉर्ड आहेत किंवा नाहीत ते तपासणी करुन त्यांची सर्टिफिकेट घ्यायला पाहिजे. जो क्रिमिनल माईंड असेल त्याला कोणीही जरासे काही बोलले की ते ताबडतोब मारायला सुरुवात करतात, शिवीगाळ करतात. वाहन चालक किंवा वाहकाला तसे पेशन्स पाहिजे. ते तिकीटामध्ये सुट्टया पैशांवरून भांडणार. त्यांनी समजा दहा रुपयांची नोट दिली तर माझ्याकडे सुट्टे पैसे नाहीत असे उद्धटपणे बोलला तर मग पॅसेंजरला राग येतो. नंतर त्याच्यावर राग ठेवतात की पुढे तो या रुटवरून आला की त्याला मारहाण करु. तसे ते प्रकरण झाले असेल असे मला वाटते. नाहीतर एवढ्या बी.एस.टी.च्या बसेस चालतात. तिकडे कधीही कोणाला मारत नाही. कधी ॲक्सीडेंट वगैरे झाला असेल. तर त्याच्या रागाने ते मारतात. पण आपले वाहन चालक आणि वाहक विद्यार्थ्याला मारतात. परत आत्ता पॅसेंजरने वाहकाला मारले. हे असे काय चालले आहे. त्याच्यावर काहीतरी बंदी घालायला पाहिजे. त्याने नुसती मारहाण केली आणि परत इकडे येउन पैसे द्या किंवा हे करा ते करा असे नाही. त्याच्यावर बेसिक विचार करायला पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

त्याला जर पैसे वगैरे द्यायचे असतील तर ते परिवहन समितीने बघावे. कारण मा. सभापतींनी परिवहन समितीला पंच्याहत्तर लाख रुपये दिले आहेत.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांनी सागितले ते बरोबर आहे. त्याची काहीतरी दुश्मनी वगैरे असेल.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, परिवहनवाले अकरा दिवस मौजमजा कराला गेले आहेत. फिरायला गेले. म्हणजे यांचे ओझे आपण डोक्यावर घेउन फिरायचे असेच झाले की नाही? तसे पण होता कामा नये. साहेब, त्याचे काही नुकसान झाले असेल. मी तुमच्या मताशी सहमत आहे. परिवहनवाल्यांनी त्यांचे ते बघून घ्यावे. दरवेळेला त्यांना कूठून पैसे द्यायचे?

**एस. ए. खान :-**

मी सांगितलेले होते की त्यांची सुप्रिटेन्ड ऑफ पोलिस तर्फे चौकशी करावी. त्या प्रोसिजरची सुरुवात केली का? मा. महापौरांनी रुलिंग दिले होते की, करण्यात यावे. त्या रुलिंगला काही इफेक्ट झाला का?

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब काल मी या प्रकरणामध्ये रात्री पावणेदोन वाजेपर्यंत होतो. ती जी व्यक्ती बसमध्ये चढली. त्याने कंडक्टरला विचारले की, तूच मला शिव्या दिल्यास का? तो मुलगा इनोसेंट होता. त्या माणसाला तो ओळखत पण नव्हता. तो त्याला मारुन उतरुन पळून गेला. पोलिस केस वगैरे झाली. पण आम्ही काल जे बघितले. आपण परिवहनला जवळ जवळ पंच्याहत्तर लाख रूपये दिलेले आहेत. पण साहेब तुम्ही त्यांच्या चौक्या तपासून बघा. ते आपले काम नाही. तिथे साधे प्यायच्या पाण्याची व्यवस्था नाही. टॉयलेट ची व्यवस्था नाही. जरी ते कॉन्ट्रॅक्टर असले तरी ते माणसेच आहेत ना? त्या बेसिक सुविधा परिवहनने त्यांना पुरवायला पाहिजे. त्याबद्दल तुम्ही थोडेसे आदेश काढा. त्यांना कमीत कमी प्यायचे पाणी तरी तिथे मिळाले पाहिजे. रात्री अपरात्री त्या कंडक्टरना मारहाण होते. रिक्षावाल्यांची दमदाटी होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ज्यावेळेला सुलभ शौचालये खाजगी लोकांना टेंडरवर दिली. आपण ठराव केले. त्या लोकांना पंचवीस हजार रुपये नळ कनेक्शन याप्रमाणे त्यांनी त्यांच्या इकडे ते कनेक्शन लावून घ्यायचे आहेत. हे ठराव झाले. सुलभ शौचालये अगदी एमर्जन्सी सर्व्हिसेस आहेत. त्याच्यात मी स्वतः विरोध केला होता की त्यांना आपण आपले इन्फ्रास्ट्रक्चर देतो. तर त्यांना आपण किमानपक्षी अर्ध्या रेटमध्ये प्रोव्हाईड करा. तसे तुम्ही त्यांना हाफ रेटमध्ये प्रोव्हाईड करुन त्यांना करु द्या. तुमच्याकडे जे कर्मचारी साफसफाई करतात. ती पण कोणाची मुले आहेत, भाउ आहे, नवरा आहेत सगळे आहे. माणूस घाणीतून येतो त्याला हातपाय धुवायला पाणी नाही. कुठलाही पाण्याचा स्त्रोत नसतो. आमच्या इकडे येउन बघा. आम्ही केले आणि मग बोलतो. आमच्या चौकीला आम्ही ते करुन घेतले जेवणाला सुट्टी झाली की त्यांना हातपाय धुवायला लागतात. कामावरून घरी जाताना हातपाय धुवायला लागतात. त्याकरिता किमानपक्षी तुमच्या प्रत्येक चौकीला हजार ते दिड हजार लिटर पाणी पाहिजेच. ती सोय आम्ही केली आहे. तशी बाकीच्या लोकांना करायला सांगा. आमच्या इकडे येउन बघा, आम्ही कशी सोय केली आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब तो कंडक्टर कुठला राहणारा आहे?

**शानू गोहिल :-**

मिरा भाईंदरमधला.

**नयना म्हात्रे :-**

तो मिरा भाईंदरमधलाच आहे पण तो नक्की कुठे राहतो?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याची माहिती मागवलेली आहे.

**नयना म्हात्रे :-**

आत्ता तो हॉस्पिटलला आहे ना?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो ॲडमिट आहे.

**नयना म्हात्रे :-**

त्याला जर पैशांची गरज लागली. तर आपल्या मा. महापौर फंडातून द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मागे एक अशी घटना घडली की एका बाईने एका कंडक्टरवर विनयभंगाची केस केली तर त्या कंडक्टरला मिरारोड पोलिस स्टेशनने पकडून नेले. आपल्या इकडचा संबंधित अधिकारी कोणीही त्या मिरारोड पोलिस स्टेशनला गेला नाही. इव्हन दोन उपायुक्त सुद्धा. आत्ता त्या ठिकाणी विनयभंग होण्याचा प्रश्नच येत नाही. पॅसेंजर्स किती आहेत? किती तिकीटे फाटली? त्याच्या पुढच्या स्टँडची किती तिकीटे आहेत? म्हणजे बसमध्ये किती प्रवासी होते? याची तुम्ही चौकशी कराल की नाही? म्हणजे ती घटना घडली की नाही? पोलिस अधिका-यांनी सरळ त्या कंडक्टरला बकोटीला पकडून जेलमध्ये घातले. आणि आपले मा. उपायुक्त इकडे केबिनला बसले आहेत. आत्ता तुमच्याकडे गाडया वगैरे सगळे दिले आहे. मग त्या उपायुक्तांचा अधिकार नाही की हे असे असे आहे. याला तुम्ही असे पकडू शकत नाही. तपास करा. एक जजमेंट असे आणलेले आहे की पोलिसांनी तपास केल्याशिवाय

कुठलीही कार्यवाही करु नये आणि तपास झाल्यानंतर मात्र लगेच एफ.आय.आर. फाईल करावा. हे बॉम्बे हायकोर्टाचे जजमेंट माझ्याकडे आहे.

**मा. सभापती :-**

महानगरपालिका हद्दीतील नव्याने तयार होणारे मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स) गाड्यांचे शोरुम, वर्कशॉप, नविन कारखाने यांना पाण्याचे नळ कनेक्शन देणेचे धोरण व दर ठरविणे बाबत.

**प्रशांत पालांडे :-**

याचा गोषवारा का दिला नाही?

**मा. सभापती :-**

आपल्याला धोरण ठरवायचे आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आम्हांला काहीतरी पाहिजे ना?

**शानू गोहिल :-**

आम्हाला या विषयाचा गोषवारा का दिला नाही?

**प्रशांत पालांडे :-**

किती कनेक्शन आहेत? कुठे आहेत?

**शानू गोहिल :-**

आपल्याकडे टोटल मॉल्स किती आहेत? ते आम्हांला माहितीच नाही.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

सद्यस्थितीची माहिती श्री. बारकुंड साहेब देतील.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्याकडे ठाकूर मॉल, कनकियामध्ये सिनेप्राईम, भाईंदर वेस्टला मॅक्सस आणि रसाज असे मॉल्स आहेत. त्यापैकी मॅक्सस मॉलला अद्यापपर्यंत कुठलीही नळजोडणी दिलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पूर्ण मिरा भाईंदरचे सांगा. हा ठराव मॅक्ससकरिता आणलेला नाही. मेहेरबानी करुन तुम्ही चुकीचा मॅसेज पाठवू नका. पूर्ण मिरा भाईंदरमध्ये जुने टॉकिज किती आहेत? नवीन टॉकीज किती? मॉल किती? मल्टीप्ले्क्स मॉल किती आहेत? मल्टीप्लेक्स थिएटर किती आहेत? त्याची पूर्ण माहिती द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब तुम्ही हा विषय पुढच्या सभेमध्ये घ्या. सविस्तर टिपणी द्या आम्हांला असे ओरली माईकमध्ये बोलले तर आमच्या लक्षात राहात नाही. हा विषय तुम्ही पुढच्या स्टॅण्डींगमध्ये घ्या आणि आत्ता पुढचा विषय घ्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो सिनेप्राईम मल्टीप्लेक्स, ठाकूर शॉपिंग मॉल, लक्ष्मी कार्स

**मिलन म्हात्रे :-**

आणखीन तीन शोरूम उघडतात. नविन तीन शोरूम उघडतात त्याला तुम्हांला पाणी द्यावेच लागणार. तो डोंबाऱ्याचा खेळ नाही. तुमच्याकडे प्लॅन पास होतात. तुम्ही सी.सी.देता किंवा जुनी फॅक्टरी आहे. तिचे प्रयोजन बदलून ती फॅक्टरी होती, आत्ता शोरुम होणार नगररचनाला काहीतरी परमिशन येते की नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

रिलायन्स आहे, रिलायन्सचे शॉपींग मॉल आहे. धोरण निश्चित करायचे तर तुमची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. हे पाणी आहे. सध्या पाणी नाही. दिले पाहिजे, नाही दिले पाहिजे. त्याच्यात प्रशासनाची काही भुमिका नाही. तुमचे काही म्हणणे नाही काय? दिले पाहिजे की नाही? पाणी टंचाई आहे तेव्हा थांबा. तुमचे त्याच्यात काही नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब शहरामध्ये पाणी टंचाई आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. कपात चालूच आहे. त्याच्यावर मा. स्थायी समितीने धोरण ठरवावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब पूर्ण टिपणी येउ द्या. एकंदर किती कनेक्शन दिलेले आहेत?

**मा. सभापती :-**

हा विषय अचानक घ्यायला लावला कारण पाण्याची टंचाई झालेली आहे. म्हणून आपल्याला याच्यावर धोरण करायचे आहे. कनेक्शनचे काम चालू आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब धोरण ठरवायच्या अगोदर यांना कनेक्शन दिलेले आहेत का?

**मा. सभापती :-**

होय दिलेले आहेत. आजपण चालूच आहेत. आपल्याला माहिती पडते की एक एका साठी दहा कनेक्शन आहेत तर आपण त्याप्रमाणे काय करावे? म्हणून हा विषय मी घ्यायला लावला.

**प्रशांत पालांडे :-**

कुठे दहा कनेक्शन आहेत. ते पण स्पष्ट होउ द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

पूर्वी दिलेले आहेत. आत्ता मा. सभापती साहेबांनी धोरण ठरविण्यासाठी भुमिका सांगितली. हा बेस आहे. पण फक्त बेस बघून चालणार नाही. सध्याची पाणी टंचाई पाहता आपल्याला धोरण ठरवावे लागणार आहे. आजची परिस्थिती अशी आहे. कपात लागू करायच्या अगोदर ही परिस्थिती नव्हती कपात लागू केल्यांनतर आपल्या शहरामध्ये सगळी अडचण आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब मला एक सांगा. आपण जेव्हा बिल्डिंगला कनेक्शन देतो, तेव्हा १२-१५ फ्लॅटमागे एक देतो. हे जे दहा दहा कनेक्शन दिले ते कुठल्या बेसवर दिले आहेत

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब हा बेस आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सिनेमाला १५ लिटर पर हेड पर डे इथे दिलेले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

ते आपल्या महापालिकेचे नाही हा बेस मॅन्यूअल ऑफ वॉटर सप्लाईंग ट्रीटमेंट, थर्ड एडीशन, कंट्रोल पब्लिक हेल्थ ॲण्ड एनव्हॉर्नमेंटल......

**प्रशांत पालांडे :-**

साहेब त्याच्यात काय लिहिले आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब काय लिहिले आहे ते वाचा.

**प्रशांत पालांडे :-**

मी वाचले. १५ लीटर पर हेड पर डे

**शिवाजी बारकुंड :-**

पर हेड पर डे पर सीट. थिएटरमध्ये सीटची कॅपेसिटी.

**प्रशांत पालांडे :-**

मग मॉलचे काय? मॉलला सिट कुठे असते?

**शिवाजी बारकुंड :-**

त्याच्यामध्ये शॉप्स असतात.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता एक लक्षात घ्या. त्याच्यामध्ये जे काही नॉर्म्स आहेत. आत्ता मुंबई महापालिकेला पाणी व्यवस्थित मिळते. त्याच्याकरिता ते नॉर्म्स बरोबर आहेत. तुमच्याकडे चार दिवस पाणीच येत नाही. तर ते नॉर्म्स तुमच्या कामाचे नाहीत. त्या नॉर्म्सच्या पहिल्या पानावरच लिहिले असेल की पाणी शहराला किती आल्यानंतर कसे वाटप करायचे आहे? नॉर्म्स आहेत, कायदा आहे, नियम आहेत हे सगळे खरे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण नॉर्म्स बनवले की बारा फ्लॅटच्या मागे एक इंचाचा द्यायचा. हे नॉर्म्स आपण बनवलेले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण धोरण ठरवतो. हे आम्ही थोडेच ठरवतो. हे तुम्ही ठरवू शकता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून सांगतो की आम्हांला सविस्तर टिपणी द्या. जोपर्यंत हे धोरण ठरत नाही. आत्ता कोणी कुठलेही कनेक्शन नाही दिले पाहिजे. आज हे डिसीजन घ्या. मॉल्स, रिलायन्सचे शॉपिंग सेंटर यांना

कोणालाही कनेक्शन द्यायचे नाही आणि पुढच्या सभेत तुम्ही सविस्तर टिपणी आणा. नंतर निर्णय घेउ सहा दिवसात कनेक्शन होत नाहीत आणि झाले तर तुम्ही कार्यवाही करा.

**शिवाजी बारकुंड :-**

सगळे आहे घरगुती आणि व्यापारी.

**शानु गोहिल :-**

घरगुती नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब ते क्लेरिफाय करुन घ्या. काही लोक त्याचा वेगळा अर्थ घेतात.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल साहेब, २७/१२/२००६ ला लक्ष्मी कारला दहा कनेक्शन दिली. त्यानंतर त्याच्यामध्ये ठाकूर शॉपिंग मॉलला जवळ जवळ सहा कनेक्शन दिली आहेत. ही माझ्याकडे दोन आली आहेत. माझ्याकडे हा तक्ता आहे. मी दि. २१/०२/२००८ ला रितसर अर्ज केला आहे. जवळ जवळ सफीशिएंट पिरियड झाल्यानंतर मा. आयुक्तांनी त्यांना आदेश दिले आहेत की सदर नळ कनेक्शन तोडावी आणि जे काही असेल ती डबल आकारणी करावी म्हणून हा विषय मा. स्थायी समितीपुढे याच्याकरिता आणला की, कारवाई आपण लवकरात लवकर केली पाहिजे. कारण आत्ता कशावरुन आणखीन दहा फाईल उद्या मंजूर होणार नाहीत? आत्ता काय गॅरेंटी आहे. आत्ता हे एवढे केले. आत्ता हे धोरण ठरवताना आपल्याकडे कुठलाही ठरावाचा रेशो धरला गेला नाही. माझ्याकडे हा तक्ता आहे आणि आपल्याला भांडण करण्यात काही अर्थ नाही. पाण्याचे कनेक्शन तुमच्याकडे पाणी तुमच्या विभागात वापरा. तो तुमचा एरिया आहे. त्याचे प्रतिनिधीत्व तुम्ही करता. ह्या कनेक्शननुसार वाटेल तसा पाणी पुरवठा होतो. त्यांनी अल्टर आखून दिल्या आहेत. त्यांनी बोरवेल मारावे. डोंगरी भागामध्ये चांगले पाणी लागते. डोंगराच्या भागात त्यांनी बोरवेल मारावे. रेन वॉटर हारवेस्टींग घ्यावे आपण त्यांना कुठे नैसर्गिक नाकारतो. आणि त्यांना किमानपक्षी दोन कनेक्शन द्यावी आणि ज्या काही केमिकल प्रोडक्शनच्या कंपन्या असतील. त्यांना टॅप वॉटर लागते. त्यांना तीन कनेक्शन द्यावी. त्याच्या व्यतिरिक्त देउ नये. अशा प्रकारचा ठराव आम्ही आणलेला आहे. शहरामध्ये पाण्याची समस्या सगळ्यांनाच आहे. तुम्ही नगरसेवक आहात मी नगरसेवक आहे. त्याकरिता हा जो ठराव आहे. जरी त्यांनी टिपणी आणली नसली. तरीही त्याच्यात आपण महानगरपालिकेच्या धोरणात बदल करतो अशातला भाग नाही की, हे बंद करा. त्यांना तीन कनेक्शन, दोन कनेक्शन द्या हे मॉडिफिकेशन आहे. त्याकरिता हा ठराव आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, तुमच्याकडे डिटेल आहे. तुम्ही सर्व डिटेल आणलेली आहे. म्हणून तुम्ही ठराव आणलेला आहे. आम्हांला डिटेल देउ द्या. सभागृहापुढे विषय आलेला आहे. आमच्याही पक्षाचे नउ नगरसेवक आहेत. त्यांनाही माहिती पडू द्या. मी गटनेता म्हणून तिकडे बसतो. आम्ही चर्चा करतो. तुम्ही आणले तुमचा ठराव वाचलेला आहे. दोन दिवसामध्ये ठरावात काही बिघडत नाही. एवढे मॉल आलेले आहेत. एवढे कनेक्शन दिलेले आहेत. एवढ्या पैशांनी दिलेले आहे. पुढे महापालिकेची यांची बाजू ऐकू द्या की दिले पाहिजे की नाही? कशा पद्धतीने...

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी दिले पाहिजेच त्यांनी दिलेली आहेत. त्यांची बाजू काय ऐकणार? प्रशासन तुमच्या कंट्रोलमध्ये राहिले नाही. अधिका-यांनी वाटेल तशी कनेक्शन्स दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय पुढच्या सभेत आणला तर दोन दिवसात काही बिघडत नाही. आज गुरुवार आहे. पुढच्या गुरुवारी किंवा बुधवारी तुम्ही मिटींग बोलवा. आम्हांला माहिती द्या. आमचेही नउ नगरसेवक या सभागृहामध्ये बसतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मी ठराव वाचन करतो. महानगरपालिका हद्दीतील नव्याने तयार होणारे मॉल, चित्रपटगृह (मल्टीप्लेक्स) गाड्यांचे शोरुम वर्कशॉप, नविन कारखाने यांना पाण्याचे नळ कनेक्शन देण्याचे धोरण व दर ठरविणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये प्रशासनाचा गोषवारा, टिपणी काही नसताना तुम्हांला जर या पद्धतीने सभा चालवयाची असेल तर आम्ही जातो.

(सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी सभात्याग केला.)

**मिलन म्हात्रे :-**

मिरा-भाईंदर शहरातील वाढत्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेता किमानपक्षी नागरीकांना पिण्याचे पाणी पुरेसे मिळण्याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने तयार होणारे मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स), गाड्यांचे शोरूम व वर्कशॉप, नविन कारखाने/रासायनिक प्रक्रियेचे कारखाने यांना आजमितीस वाणिज्य प्रयोजनाकरीता नविन जलजोडणी शुल्क रू.२५,०००/-(अक्षरी रू. पंचवीस हजार) एवढे आहे. त्यामध्ये वाढ करून रू.१,००,०००/- (अक्षरी रू. एक लक्ष) इतके यापुढे आकारण्यात यावे. तसेच हॉटेलसाठी रू.२५,०००/-(अक्षरी रू. पंचवीस हजार) ऐवजी वाढीव रू.५०,०००/- (अक्षरी रू. पन्नास हजार) करावे हे करताना हॉटेलच्या प्रति हजार चौरस फुटापर्यंत रू.२५,०००/- इतके व त्यावरील क्षेत्रफळास रू.५०,०००/- इतके नविन जलजोडणी शुल्क आकारण्यात यावे. वरील मालमत्तांना जलजोडणी देणेपुर्वी बोरींग (विंधण विहीर) अथवा रेन वॉटर हारवेस्टींग सारखे नैसर्गिक पाणी मिळण्याचे स्त्रोत यशस्वी होतील किंवा कसे याची खातरजमा अथवा पडताळणी करावी. तशा प्रकारचे तज्ञांचे भुजल सर्वेक्षण खात्यामार्फत दाखले सादर करण्यात यावेत. तद्नंतर वास्तुविशारदामार्फत सदर प्रयोजनाकरीता त्या इमारतींच्या मंजूर नकाशातील मोकळ्या जागेत जागा राखून ठेवावी.

तसेच मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स), गाड्यांचे शोरूम व वर्कशॉप, नविन कारखाने या मालमत्तांना सध्या असलेले पाणीपट्टी शुल्क रू.२८.०० प्रति हजार लिटर ऐवजी रू.५०.०० प्रति हजार लिटर नव्याने आकारण्यात यावे.

राज्य शासनाकडील दि. १० मार्च २००५ च्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करावी. वरील उल्लेख केलेल्या मिळकतीस पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याकरीता वरील मिळकतींपैकी रासायनिक प्रक्रिया करण्यात येणाऱ्या कारखान्यांना १" व्यासाच्या, २ किंवा ३ यापेक्षा ज्यादा जलजोडण्या देण्यात येऊ नये.

वरील मिळकतीस या ठरावाच्या अगोदर देण्यात आलेल्या जलजोडण्या ज्यादा असतील तर त्या तोडण्यात याव्यात व त्याची महानगरपालिकेकडे असलेली अनामत रक्कम व त्या अनुषंगाने असणारी इतर जमा रक्कम परत करावी. या कृतीस कोणताही दंड लागणार नाही. त्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर निर्णय धोरणात्मक असल्याने सबंधित विभागाने तात्काळ हा विषय मा. महासभेकडे अंतिम मंजुरीकरीता पाठविण्यात यावा.

**गणेश शेट्टी :-**

अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

मिरा-भाईंदर शहरातील वाढत्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेता किमानपक्षी नागरीकांना पिण्याचे पाणी पुरेसे मिळण्याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने तयार होणारे मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स), गाड्यांचे शोरूम व वर्कशॉप, नविन कारखाने/रासायनिक प्रक्रियेचे कारखाने यांना आजमितीस वाणिज्य प्रयोजनाकरीता नविन जलजोडणी शुल्क रू.२५,०००/-(अक्षरी रू. पंचवीस हजार) एवढे आहे. त्यामध्ये वाढ करून रू.१,००,०००/- (अक्षरी रू. एक लक्ष) इतके यापुढे आकारण्यात यावे. तसेच हॉटेलसाठी रू.२५,०००/-(अक्षरी रू. पंचवीस हजार) ऐवजी वाढीव रू.५०,०००/- (अक्षरी रू. पन्नास हजार) करावे हे करताना हॉटेलच्या प्रति हजार चौरस फुटापर्यंत रू.२५,०००/- इतके व त्यावरील क्षेत्रफळास रू.५०,०००/- इतके नविन जलजोडणी शुल्क आकारण्यात यावे. वरील मालमत्तांना जलजोडणी देणेपुर्वी बोरींग (विंधण विहीर) अथवा रेन वॉटर हारवेस्टींग सारखे नैसर्गिक पाणी मिळण्याचे स्त्रोत यशस्वी होतील किंवा कसे याची खातरजमा अथवा पडताळणी करावी. तशा प्रकारचे तज्ञांचे भुजल सर्वेक्षण खात्यामार्फत दाखले सादर करण्यात यावेत. तद्नंतर वास्तुविशारदामार्फत सदर प्रयोजनाकरीता त्या इमारतींच्या मंजूर नकाशातील मोकळ्या जागेत जागा राखून ठेवावी.

तसेच मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स), गाड्यांचे शोरूम व वर्कशॉप, नविन कारखाने या मालमत्तांना सध्या असलेले पाणीपट्टी शुल्क रू.२८.०० प्रति हजार लिटर ऐवजी रू.५०.०० प्रति हजार लिटर नव्याने आकारण्यात यावे.

राज्य शासनाकडील दि. १० मार्च २००५ च्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करावी. वरील उल्लेख केलेल्या मिळकतीस पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याकरीता वरील मिळकतींपैकी रासायनिक प्रक्रिया करण्यात येणाऱ्या कारखान्यांना १" व्यासाच्या, २ किंवा ३ यापेक्षा ज्यादा जलजोडण्या देण्यात येऊ नये.

वरील मिळकतीस या ठरावाच्या अगोदर देण्यात आलेल्या जलजोडण्या ज्यादा असतील तर त्या तोडण्यात याव्यात व त्याची महानगरपालिकेकडे असलेली अनामत रक्कम व त्या अनुषंगाने असणारी इतर जमा रक्कम परत करावी. या कृतीस कोणताही दंड लागणार नाही. त्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर निर्णय धोरणात्मक असल्याने सबंधित विभागाने तात्काळ हा विषय मा. महासभेकडे अंतिम मंजुरीकरीता पाठविण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

१००० फूट के अंदर का जो दुकान है उसको २५ हजार रखा है। १००० फुट के उपर जो १० हजार, १५ हजार फुट का बडा हॉटेल उसको ५० हजार रखा है। और मॉल वगैरा है उसके लिए एक लाख है।

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब तुम्ही अधिकाऱ्यांना आदेश द्या की विदाउट गोषवारा विषय आणत जाऊ नका.

**मिलन म्हात्रे :-**

एक हॉटेल आहे. तो एकाकरिता घेणार आणि मॉलमध्ये पन्नास जणांचे डिपॉझिट घेणार.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

हा विषय आला नसता तर यांनी आणखीन कनेक्शन दिले असते.आपल्याला माहितीपण पडले नसते. हा विषय आणल्यामुळे त्याच्यावर कंट्रोल राहिल.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

लक्ष्मी कारला दहा कनेक्शल दिले तेव्हा आपल्या कोणत्या नगरसेवकाला माहिती होते का? कारण आम्ही ते कनेक्शन दिले नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्याकडे आणखीन माहिती आहे. पण मी हा ठराव मा. महासभेला आल्यावर ती उघड करेन.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ते लोक कमर्शिअलला जास्त टॅक्स भरत नाहीत का?

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या बिल्डिंगमध्ये लोक राहतात. त्यांना पंधरा फ्लॅटला एक कनेक्शन हा नियम आहे ना? तुमच्या तिकडे त्यांनी दहा मारली. त्याला काही नियम, कायदा, धरबंद काही आहे का? उद्या अशी पन्नास मारतील. तुम्ही जर फ्लॅटला बंधन घालता तर त्यांना घालणे गरजेचे नाही का? तुमचे म्हणणे असे आहे का, लक्ष्मी कारवाल्याने दिवसभर पिण्याच्या पाण्याने गाड्या धुवायच्या? आमचे म्हणणे आहे की त्यांनी गाड्या धुवायच्या नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

गाड्या धुणाऱ्यांना कनेक्शन देउच नका.

**मिलन म्हात्रे :-**

तेच तर त्या ठरावामध्ये आहे. आत्ता आपण सर्व्हिसला गाडी टाकतो. आपल्याकडून ते लोक किमानपक्षी दिड हजार रुपये घेतात. पाणी किती वापरणार २०० ते २५० लीटर. दिड हजार रुपये ते सर्व्हिसिंगचे घेतात. एक तर पाणी नाही. आपल्याकडे पाण्याची कमतरता आहे म्हणून मी हा ठराव आणला आहे आणि हा ठराव तुम्ही कुठेही न्या. या ठरावाला काट नाही. तुम्हांला होईल तेवढी पाण्याची बचत केली पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण ठराव करताना अठ्ठावीसचे पन्नास केले. आणि हॉटेलवाल्यांना तुम्ही पन्नास हजार डिपॉझिट लावले.

**मिलन म्हात्रे :-**

हॉटेलवाला हा एक मालक आहे. मॉलमध्ये ५० X १ असतो हे लक्षात घ्या. ते पन्नास लोकांना लावणार म्हणजे त्या तिकडे जो हॉटेल घेउन बसला त्याला एकच हजार लागणार आहे. हे लक्षात घ्या. जो छोटा हॉटेलवाला आहे, हजार फुटाच्या आतला, त्याला पंचवीस हजार आहे. म्हणजे जी छोटी खानावळ वगैरे असेल त्याला पंचवीस आहे आणि एक हजार फुटाच्या वर जो आहे. त्याला

पन्नास हजार आहे. याच्यात कोणावर अन्याय झाला असे आपल्याला वाटत नाही. आणि आपल्या जुन्या ठरावाला पण आपण डॅमेज करत नाही माझ्याकडे जुने ठराव आहेत.

**प्रकरण क्र. ०१ :-**

महानगरपालिका हद्दीतील नव्याने तयार होणारे मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स) गाड्यांचे शोरुम वर्कशॉप, नविन कारखाने यांना पाण्याचे नळ कनेक्शन देणेचे धोरण व दर ठरविणे बाबत.

**ठराव क्र. ०१ :-**

मिरा-भाईंदर शहरातील वाढत्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेता किमानपक्षी नागरीकांना पिण्याचे पाणी पुरेसे मिळण्याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने तयार होणारे मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स), गाड्यांचे शोरुम व वर्कशॉप, नविन कारखाने/रासायनिक प्रक्रियेचे कारखाने यांना आजमितीस वाणिज्य प्रयोजनाकरीता नविन जलजोडणी शुल्क रू.२५,०००/-(अक्षरी रू. पंचवीस हजार) एवढे आहे. त्यामध्ये वाढ करून रू.१,००,०००/- (अक्षरी रू. एक लक्ष) इतके यापुढे आकारण्यात यावे. तसेच हॉटेलसाठी रू.२५,०००/-(अक्षरी रू. पंचवीस हजार) ऐवजी वाढीव रू.५०,०००/- (अक्षरी रू. पन्नास हजार) करावे हे करताना हॉटेलच्या प्रति हजार चौरस फुटापर्यंत रू.२५,०००/- इतके व त्यावरील क्षेत्रफळास रू.५०,०००/- इतके नविन जलजोडणी शुल्क आकारण्यात यावे. वरील मालमत्तांना जलजोडणी देणेपुर्वी बोरींग (विंधण विहीर) अथवा रेन वॉटर हारवेस्टींग सारखे नैसर्गिक पाणी मिळण्याचे स्त्रोत यशस्वी होतील किंवा कसे याची खातरजमा अथवा पडताळणी करावी. तशा प्रकारचे तज्ञांचे भुजल सर्वेक्षण खात्यामार्फत दाखले सादर करण्यात यावेत. तद्नंतर वास्तुविशारदामार्फत सदर प्रयोजनाकरीता त्या इमारतींच्या मंजूर नकाशातील मोकळ्या जागेत जागा राखून ठेवावी.

तसेच मॉल, चित्रपटगृहे (मल्टीप्लेक्स), गाड्यांचे शोरुम व वर्कशॉप, नविन कारखाने या मालमत्तांना सध्या असलेले पाणीपट्टी शुल्क रू.२८.०० प्रति हजार लिटर ऐवजी रू.५०.०० प्रति हजार लिटर नव्याने आकारण्यात यावे.

राज्य शासनाकडील दि. १० मार्च २००५ च्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करावी. वरील उल्लेख केलेल्या मिळकतीस पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याकरीता वरील मिळकतींपैकी रासायनिक प्रक्रिया करण्यात येणाऱ्या कारखान्यांना १" व्यासाच्या, २ किंवा ३ यापेक्षा ज्यादा जलजोडण्या देण्यात येऊ नये.

वरील मिळकतीस या ठरावाच्या अगोदर देण्यात आलेल्या जलजोडण्या ज्यादा असतील तर त्या तोडण्यात याव्यात व त्याची महानगरपालिकेकडे असलेली अनामत रक्कम व त्या अनुषंगाने असणारी इतर जमा रक्कम परत करावी. या कृतीस कोणताही दंड लागणार नाही. त्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर निर्णय धोरणात्मक असल्याने सबंधित विभागाने तात्काळ हा विषय मा. महासभेकडे अंतिम मंजुरीकरीता पाठविण्यात यावा.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे** **अनुमोदक :- श्री. गणेश गोपाळ शेट्टी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०२ त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणे बाबत.

**शानु गोहिल :-**

सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २००७ ते डिसेंबर २००७ चे त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २००७ ते डिसेंबर २००७ चे त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ०२ :-**

सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २००७ ते डिसेंबर २००७ चे त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २००७ ते डिसेंबर २००७ चे त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदक :- श्रीम. सुनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०३ भाईंदर (प.) कै. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग (मांडली तलाव उद्यान ते टेंभा हॉस्पिटल रस्ता) व कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (नगरभवन ते मनपा कार्यालय, कोंबडी गल्ली) येथे एकेरी वाहतुक सुरु करण्यास मंजूरी देणे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब पहिली गोष्ट तर गुणवंतराय त्रिवेदी हे भाईंदर शहरातील चांगले व्यक्तिमत्व होते. गुणवंतराव नाही त्यांचे नाव राय आहे. आणि पुढचा ठराव असा आहे,

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे कै. डॉ. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग (मांडली तलाव उदयान ते टेंभा हॉस्पीटल रस्ता) व कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (नगरभवन ते मनपा कार्यालय, कोंबडी गल्ली) हे रस्ते विकास आराखडयातील असून सदर रस्ते हे खुपच अरुंद आहेत. दोन्ही रस्त्यांवर दुतर्फा वाहतूक सुरु असल्याने वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असते. सदर दोन्ही रस्त्यावर जुनी इमारती घरे असल्याने डी. पी. नुसार रुंदीकरण करण्यास नियमानुसार कार्यवाही करावी लागणार आहे. सदर रस्ते एक दिशा मार्ग करण्याबाबत स्थानिक रहिवाशी, लोकप्रतिनिधी यांची मागणी होती. त्यानुसार मा. पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्याकरीता परवानगी करीता प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानुसार भाईंदर (प.) कै. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग (मांडली तलाव उदयान ते टेंभा हॉस्पीटल रस्ता) व कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (नगरभवन ते मनपा कार्यालय, कोंबडी गल्ली) येथे एकेरी वाहतूक सुरु करण्यास मा. पोलिस उप-निरीक्षक, वाहतूक शाखा, ठाणे-ग्रामीण यांनी दि. २५/०१/२००८ च्या पत्रान्वये नाहरकत पत्र दिले आहे. सदर दोन्ही रस्ते एकेरी करणे आवश्यक आहे. भाईंदर (प.) कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (कोंबडी गल्ली) हा मार्ग नगरभवन येथून मनपा कार्यालयाकडे येण्याकरीता ठेवणे योग्य होईल. तसेच कै. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग हा रस्ता उड्डाणपुलावरुन भाईंदर (प.) नगरभवनकडे येण्याकरीता एकेरी करणे योग्य होईल. भाईंदर (प.) उड्डाणपुलाकडे जाण्याकरीता भगवान सिमंधर स्वामी मार्ग हा रस्ता ठेवणे योग्य होईल.

प्रशासनाच्या वरील गोषवाऱ्यानुसार सदर दोन्ही रस्ते एक दिशा मार्ग करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर रस्त्यावर त्वरीत फलक बसवून पोलिस विभागास कळविण्यात यावे. तसेच सदर रस्त्यांवर होणारी पार्किग त्वरीत बंद करून नो पार्किंगचे फलक लावून पोलिस विभागास कळवावे. तसेच उभी राहणारी वाहने उचलण्यात यावी.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बारकुंड साहेब हे दोनच रस्ते का घेतले?

**शिवाजी बारकुंड :-**

पोलिस डिपार्टमेंटकडून पत्र आलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

असाच प्रश्न पेणकरपाड्यातून चेक नाक्याकडे जाणारा रस्ता आहे तिथे ठाकूर मॉल झाल्यानंतर खूप गर्दी होते. जवळ जवळ एक तास जातो. आपल्या डी.पी. प्लॅनमध्ये याला पर्यायी रस्ता आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही मागणी करा आम्ही तपासणी करु.

**प्रकरण क्र. ०३:-**

भाईंदर (प.) कै. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग (मांडली तलाव उद्यान ते टेंभा हॉस्पिटल रस्ता) व कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (नगरभवन ते मनपा कार्यालय कोंबडी गल्ली) येथे एकेरी वाहतूक सुरु करण्यास मंजूरी देणे.

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे कै. डॉ. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग (मांडली तलाव उदयान ते टेंभा हॉस्पीटल रस्ता) व कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (नगरभवन ते मनपा कार्यालय, कोंबडी गल्ली) हे रस्ते विकास आराखडयातील असून सदर रस्ते हे खुपच अरुंद आहेत. दोन्ही रस्त्यांवर दुतर्फा वाहतूक सुरु असल्याने वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असते. सदर दोन्ही रस्त्यावर जुनी इमारती घरे असल्याने डी. पी. नुसार रुंदीकरण करण्यास नियमानुसार कार्यवाही करावी लागणार आहे. सदर रस्ते एक दिशा मार्ग करण्याबाबत स्थानिक रहिवाशी, लोकप्रतिनिधी यांची मागणी होती. त्यानुसार मा. पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्याकरीता परवानगी करीता प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानुसार भाईंदर (प.) कै. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग (मांडली तलाव उदयान ते टेंभा हॉस्पीटल रस्ता) व कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (नगरभवन ते मनपा कार्यालय, कोंबडी गल्ली) येथे एकेरी वाहतूक सुरु करण्यास मा. पोलिस उप-निरीक्षक, वाहतूक शाखा, ठाणे-ग्रामीण यांनी दि. २५/०१/२००८ च्या पत्रान्वये नाहरकत पत्र दिले आहे. सदर दोन्ही रस्ते एकेरी करणे आवश्यक आहे. भाईंदर (प.) कै. रघुनाथ म्हात्रे मार्ग (कोंबडी गल्ली) हा मार्ग नगरभवन येथून मनपा कार्यालयाकडे येण्याकरीता ठेवणे योग्य होईल. तसेच कै. गुणवंतराव त्रिवेदी मार्ग हा रस्ता उड्डाणपुलावरुन भाईंदर (प.) नगरभवनकडे येण्याकरीता एकेरी करणे योग्य होईल. भाईंदर (प.) उड्डाणपुलाकडे जाण्याकरीता भगवान सिमंधर स्वामी मार्ग हा रस्ता ठेवणे योग्य होईल.

प्रशासनाच्या वरील गोषवाऱ्यानुसार सदर दोन्ही रस्ते एक दिशा मार्ग करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर रस्त्यावर त्वरीत फलक बसवून पोलिस विभागास कळविण्यात यावे. तसेच सदर रस्त्यांवर होणारी पार्किंग त्वरीत बंद करून नो पार्किंगचे फलक लावून पोलिस विभागास कळवावे. तसेच उभी राहणारी वाहने उचलण्यात यावी.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे          अनुमोदक :- श्री. प्रकाश ठाकूर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी कर्मचारी वर्ग, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करतो

**सभा संपल्याची वेळ :- १२.२५ वाजता**